# निवेदन

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्याशाखांमध्ये **शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी "आचार्य पदवी (Ph.D)** अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **सामाईक प्रवेश परीक्षा-२०२२"** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत **दि.१३.११.२०२२** रोजी महाराष्ट्रातील **६ केंद्रांवर** आयोजित करण्यात येत आहे. कोरोना/कोव्हीड-१९ विषाणू साथरोगाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांसाठी राज्य व केंद्र शासनाने वेळोवेळी प्रसारित केलेल्या प्रतिबंधात्मक नियमावली**" मानक कार्यप्रणालींचे (एसओपी)"** काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदव्युत्तर विद्यार्थी तसेच, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदव्युत्तर परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचणे अत्यावश्यक आहे. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याचा कालावधी **दि.२३.०८.२०२२ ते दि.०८.०९.२०२२** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन बॅकींग (नेटबॅकींग) डेबिट/क्रेडीट कार्डव्दारे **दि.२३.०८.२०२२ ते दि.०९.०९.२०२२** (दुपारी १२.००) पर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परीक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

संभाव्य पात्र व अपात्र उमेदवारांची तात्पुरती यादी **दि.१४.०९.२०२२** रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले 'परीक्षा प्रवेश पत्र' सदरील संकेतस्थळावरुन **दि.०१.११.२०२२** पासून प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेचा संभाव्य **दि.१३.११.२०२२ असून** परीक्षेचा निकाल **दि.२८.११.२०२२** रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे संबंधित संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८५१९/ ०२०-२५५२८११९ या दुरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा, असे नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

दिनांक : २२.०८.२०२२
स्थळ : पुणे

**नियंत्रक**
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे
(मो.नं. ७५८८६११०२५)

A/D:/Ph.D-22/Batami